# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Senior Citizen**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **13/05/2023**

**Brief of the work done** :-

वयोवृध्द दांपत्यास जबर मारहाण करून लुटणारी टोळी जेरबंद ; 07 गुन्हे उघड, 02 आरोपींसह 08.70 लाखांचा मुद्देमाल जप्त.

# वृद्ध दाम्पत्यास लुटणारी टोळी जेरबंद

## सात गुन्हे उघड; दोन आरोपींसह ८.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वाशीम, ता. १२ :** नुकतेच वाशीम शहर, वाशीम ग्रामीण व मालेगाव पोलिस स्टेशन हद्दीत विविध ठिकाणी जबरी चोरीसह घरफोड्या करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश प्राप्त झाले आहे.

वाशीम शहरातील जुनी आयुडीपी कॉलनी, वाशीम येथील एका कुटुंबातील पती-पत्नीस घरात घुसून जबर मारहाण करत जबरी चोरीची घटना घडली होती. त्याचबरोबर शहराच्या हद्दीतील मानमोठे नगर, अवलिया बाबा नगर शेलू रोड, सिव्हील लाईन्स येथे, ग्रामीण हद्दीतील ग्राम काकडदाती येथे व इंगोले ले-आउट, कोंडाळा रोड येथे तसेच मालेगाव शहरातील गीता नगर येथे रात्री घरफोड्या झाल्या होत्या.

सदर प्रकरणांचा तपास करत असतांना घटनास्थळी पुरेशे तांत्रिक पुरावे उपलब्ध नसताना गोपनीय माहितीच्या आधारे आपले तपास कौशल्य पणास लावत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जबरी चोरीसह घरफोड्या करणाऱ्या दोन



**वाशीम : पकडलेल्या आरोपींसह पोलिस.**

आरोपींना बुलढाणा येथून ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ८.७० लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक आरोपींवर यापूर्वीदिखील वाशीम, बुलढाणासह विविध जिल्ह्यांमध्ये १० पेक्षा जास्त गुन्हे दाखल असून त्यानुषंगाने अटक आरोपींविरुद्ध कडक कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक भारत तांगडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.सोमनाथ जाधव, स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम, सपोनि. विजय जाधव, पोउपनि.शब्बीर पठाण, पोहवा. सुनील पवार, पोना.राजेश राठोड, मपोना. रेश्मा ठाकरे, पो.शि. डीगांबर मोरे, निलेश इंगळे, अविनाश वाढे, शुभम चौधरी, विठ्ठल सुर्वे सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांनी पार पाडली.